*दि चिल्ड्रेन्स एड सोसायटीच्या बाल कल्याण नगरी येथे जरी या संस्थेकडून प्रवेशीतांना गणवेश वाटप*

दि चिल्ड्रेन्स एड सोसायटीच्या मानखुर्द येथील बाल कल्याण नगरी येथील प्रवेशीतांच्या चेहऱ्यावरून आज आनंद ओसंडून वाहत होता. नवीन कपडे मिळाल्याने आनंदाचे आणि कृतज्ञेचे भाव त्यांच्या चेहऱ्यावर उमटताना दिसत होते. दिनांक 14 जुलै रोजी मानखुर्द विभागातील बालकल्याण नगरी येथील 60 मुले आणि 75 मुलींना घाटकोपर येथील जरी या संस्थेच्या वतीने गणवेश वाटप करण्यात आले. नवीन कपड्याच्या सुवासाने आणि देणगीदारांच्या दातृत्व भावाने बाल कल्याण नागरी येथील वातावरण भारावुन गेले होते. जरी या संस्थेचे स्वयंसेवकांनी यावेळी प्रवेशीतांना मार्गदर्शन करतांना स्वच्छतेचे धडे दिले. येथील परिसर आणि कामकाज पाहून देणगीदार प्रभावित झाले व त्यांनी भविष्यात वेळोवेळी भेट देत राहू व मदत करत राहू असे आश्वासीत केले. संस्थेतील प्रवेशितांच्या अन्न, वस्त्र, आरोग्य व शिक्षण या मूलभूत गरजा पूर्ण करतांना सामाजिक संस्था व देणगीदारांची साथ मिळते म्हणूनच हे कार्य चालू आहे असे सांगत बाल कल्याण नगरीचे अधीक्षक श्री.तानाजी पोळ यांनी जरी या संस्थेच्या कार्यकर्त्यांचे आभार व्यक्त केले.







